# नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, तळ मजला, भू.क्र.१, किल्ले गांवठाण जवळ, सेक्टर-१५ए,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४. दुरध्वनी क्रमांक : ०२२-२७५६७०६७ ईमेल आय.डी. nmmcedu@gmail.com.

जा.क्र.नमुंमपा/शि.म./खाप्राशा/२६८४/२०१६
दिनांक :- ०८/१२/२०१६

## परिपत्रक

मान्यताप्राप्त सर्व प्राथमिक शाळांना कळविण्यात येते की, शाळांबाबत या कार्यालयामध्ये पालकांच्या/नागरीकांच्या ब-याच तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशाची सुरूवात होत आहे.

यास्तव, या परिपत्रकान्वये सर्व प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, खालील विषयी शासन निर्णयांचे तंतोतंत पालन करावे.

| अ.क्र. | बाब | शासन निर्णय |
|---|---|---|
| १. | २५% मोफत प्रवेशाबाबत | RTE Act २००९, RTE Rule २०११, शासन अधिसूचना १५ मार्च, २०१३, शासन अधिसूचना १५ मे, २०१४, |
| २. | फी बाबत/ शिक्षक पालक संघाबाबत | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ दिनांक २१ मार्च, २०१४ व दिनांक १३ एप्रिल, २०१६ |
| ३. | देणगी शुल्क घेण्यास प्रतिबंध बाबत. | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (देणगी प्रतिबंध) कायदा १९८७ व बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये देणगी शुल्क घेण्यास पतिबंध बाबतचे शासन निर्णय क्र. माशाफी १११०/(३४४/२०१०) माशि-३, दिनांक २१ एप्रिल २०१२ |
| ४. | बालकांना शारिरीक व मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध | शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्रमांक : पीआरई-२०१०/प्र.क्र. ५८९/प्राशि-१, १ मार्च, २०११. |
| ५. | बालकांचे लैंगिक अपराध | बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम २०१२ बाबतचे शासन परिपत्रक क्रमांक प्राशिधो २०१३/प्र.क्र.२४/प्राशि-१, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ व शालेय शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक संकिर्ण-२०१६ प्र.क्र.(१४४/१६) एस.डी.-६, दि. ०४ ऑक्टोंबर, २०१६. |
| ६. | शाळा प्रवेशासाठी बालकाचे वय | शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-९८१४/ प्र.क्र.१६०/एस.डी.१, दिनांक २१ जानेवारी २०१५. |
| ७. | शालेय वाहतुकीबाबत | मोटार वाहन अधिनियम १९८८ अंतर्गत महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुल बसकरीता विनियम) नियम २०११ व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, २०१३ |
| ८. | शालेय मैदानाबाबत | मैदानाबाबत सिडको यांचेशी झालेल्या कराराच्या अटी व शर्तीचे पालन करावे |

उक्त अधिनियम, शासन परिपत्रक व शासन निर्णय यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत आपणांस यापूर्वीही सूचना दिलेल्या आहेत.

तरी या परिपत्रकान्वे आपणांस पुनश्च: कळविण्यात येते की, उक्त अधिनियम, शासन परिपत्रक व शासन निर्णय यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. अन्यथा याबाबत उद्भवणा-या तक्रांरीबाबत सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील, याची नोंद घ्यावी.

(संदीप संगवे)
शिक्षणाधिकारी
नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. आयुक्त, नमुंमपा
२) मा. शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे.
३) मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग मुंबई
४) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. ठाणे यांना समादराने